# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:11.05.2026** **वारः सोमवार**

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज गुजरातमध्ये सोमनाथ अमृत पर्व उपक्रमात सहभागी होणार
2. तमिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून तमिळगा वेत्री कळ्ळघमचे विजय यांचा शपथविधी
3. राज्यात येत्या जुलै महिन्यापासून 'लँड टायटलिंग ॲक्ट' लागू होणार; आणि
4. देशात पूर तसंच उष्णतेच्या लाटांच्या शक्यतेच्या पार्श्र्वभूमीवर करण्यात आलेल्या तयारीचा केंद्रीय गृहमंत्र्यांकडून आढावा

**नरेंद्र मोदी**

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या गुजरातमधील सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाला यंदा 75 वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्तानं आयोजित 'सोमनाथ अमृत पर्व' उपक्रमात आज पंतप्रधान नरेंद्र मोदी सहभागी होणार आहेत. प्रभास पाटण इथं आयोजित जाहीर सभेलाही ते संबोधित करणार आहेत. तत्पूर्वी काल प्रभास पाटणमध्ये भारतीय वायू दलाने चित्तथरारक हवाई प्रात्यक्षिकं सादर केली. सोमनाथ अमृत पर्वानिमित्त मंदिर परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली आहे.

**पंतप्रधान बेंगलुरू**

शेतकरी तसंच ग्रामीण समुदायांना नैसर्गिक शेती करण्यास प्रवृत्त करण्यासाठी आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशनसारख्या आध्यात्मिक केंद्रांची मदत होऊ शकेल, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. बेंगळुरु इथं आर्ट ऑफ लिव्हिंगच्या 45व्या वर्धापन दिन समारंभात ते बोलत होते. भूमातेसाठी नुकसानकारक ठरत असलेल्या रासायनिक खतांच्या वापरास परावृत्त करून शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीकडे वळवण्यात तसंच पीक उत्पादनासाठी पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा पुरेपूर वापर करून घेण्यासंबंधीच्या उपक्रमांमध्येही संस्था सक्रिय भूमिका बजावू शकेल, असंही ते म्हणाले. राष्ट्र उभारणीच्या कार्यात राजकीय व्यवस्थेपेक्षाही सामाजिक सहभाग अधिक प्रबळ ठरू शकतो, यावर त्यांनी भर दिला. यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते आर्ट ऑफ लिव्हिंग आंतरराष्ट्रीय केंद्रात नव्यानं उभारण्यात आलेल्या ध्यान मंदिराचंही उद्घाटन करण्यात आलं.

पंतप्रधानांच्या हस्ते काल तेलंगणमध्ये हैदराबाद इथंही 9 हजार चारशे कोटी रुपयांच्या विविध पायाभूत सुविधा आणि औद्योगिक प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली. पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इंधनाचा संयमित वापर करणं ही सध्याच्या काळाची गरज आहे. आयात केलेल्या पेट्रोलियम उत्पादनांचा वापर गरजेनुसार आणि अत्यंत विचारपूर्वक केला जावा. असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल देशवासियांना केलं. केंद्राने उचललेल्या पावलांमुळे, पश्चिम आशियातील संघर्षामुळे निर्माण झालेली ऊर्जा संकटाची परिस्थिती आपण अत्यंत प्रभावीपणे हाताळत आहोत. यामुळे परकीय चलनाची बचत होण्यास आणि सध्या सुरू असलेल्या संघर्षाचे प्रतिकूल परिणाम कमी करण्यास मदत होईल असंही त्यांनी नमूद केलं.

**विजय शपथ विधी**

तमिळनाडूमध्ये, 'तमिळगा वेत्री कळघम' म्हणजेच 'टीव्हीके' पक्षाचे संस्थापक सी. जोसेफ विजय यांनी काल सकाळी चेन्नई इथं पार पडलेल्या सोहळ्यात मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. तमिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी विजय यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी विजय यांच्यासोबतच नऊ जणांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. या समारंभाला लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी आणि तमिळ चित्रपटसृष्टीतील अनेक मान्यवर उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विजय यांचं अभिनंदन केलं असून त्यांच्या आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. टीव्हीकेनं येत्या बुधवारी विधानसभेत बहुमत सिद्ध करावं असं राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी सांगितलं आहे.
दरम्यान आसाम विधानसभेत भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी हिमंता बिस्व सरमा यांची निवड करण्यात आली. उद्या मंगळवारी आसामच्या नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी होणार आहे. पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेश मुख्यमंत्रीपदी एन. रंगास्वामी यांची राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी निवड केली. रंगास्वामी यांचा बुधवारी, 13 मे रोजी शपथविधी होईल.

**<u>बावनकुळे</u>**

राज्यात येत्या जुलै महिन्यापासून 'लँड टायटलिंग ॲक्ट' लागू होणार आहे; असा कायदा करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य असेल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल पुण्यात दिली. भारती विद्यापीठाच्या 62व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. राज्य शासनानं कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण राबवून दीड हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार केले आहेत, तसंच दीड लाख विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचं प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे, असं बावनकुळे म्हणाले. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, राष्ट्रभक्ती आणि शिस्तही महत्त्वाची असल्याचं मंत्री दादा भुसे यांनी यावेळी बोलताना सांगितलं. यावेळी जेष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई यांना दुसरा डॉ. पतंगराव कदम स्मृती पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

**<u>अमित शहा-आढावा</u>**

येत्या काही काळात संभाव्य पूर तसंच उष्णतेच्या लाटा येण्याच्या शक्यतेच्या पार्श्र्वभूमीवर त्याला तोंड देण्यासाठी देशभरात करण्यात आलेल्या तयारीचा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल नवी दिल्लीत आढावा घेतला. या उच्च-स्तरीय बैठकीत केंद्र सरकारी संस्थानी या स्थितीचा सामना करण्याच्या अनुषंगानं केलेली तयारी, आपत्तीची पूर्वसूचना देणाऱ्या प्रणाली, मनुष्यबळासह इतर यंत्रणांची नियुक्ती, संबंधित संस्थांमधील परस्पर समन्वय, जीवितहानी टाळण्याबरोबरच मालमत्तेचं कमीत कमी नुकसान सुनिश्चित करण्यासाठी करण्यात आलेल्या उपायांचा त्यांनी आढावा घेतला. याशिवाय पुरस्थितीचं संकट टाळण्यासाठी संपूर्ण देशभर हाती घेण्यात आलेल्या दीर्घकालीन उपाययोजनांमध्ये झालेल्या प्रगतीचाही त्यांनी मागोवा घेतला.

**<u>मसाप</u>**

अखिल भारतीय साहित्य महामंडळाचा कार्यभार काल महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण, प्रमुख कार्यवाह डॉक्टर स्वाती महाळंक आणि कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर यांनी स्वीकारला. महामंडळाची बैठक काल पुण्यात झाली, त्यामध्ये प्रभारी अध्यक्ष गुरय्या स्वामी यांनी माजी संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील यांच्या उपस्थितीत नवी पदाधिकाऱ्यांकडे कार्यभार सुपूर्द केला. या बैठकीत महामंडळाचे विविध राज्यातील पदाधिकारी उपस्थित होते. शंभरावं साहित्य संमेलन मसापतर्फे पुण्यातच आयोजित करण्यात येईल, यावर या बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आलं. यासाठी स्थळ पाहणी समिती स्थापन करण्यात आली असून तिची पुढील बैठक 14 जूनला पुण्यात होणार आहे.

**<u>मोर्चा</u>**

नसरापूर घटनेच्या निषेधार्थ काल पुण्यात विविध संस्था आणि संघटनांच्या वतीनं मूक मोर्चा काढण्यात आला. या प्रकरणातील आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा झाली पाहिजे अशा आशयाचे फलक घेत आंदोलनकर्त्यांनी बालगंधर्व रंगमंदिर परिसरातून हा निषेध मोर्चा काढला. या मोर्चात नागरिक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

**चाकणकर चौकशी**

लैंगिक अत्याचार प्रकरणी अटकेत असलेल्या अशोक खरात प्रकरणी, राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष रुपाली चाकणकर यांची काल नाशिकमध्ये विशेष तपास पथकानं चौकशी केली. जवळपास सहा तास ही चौकशी सुरू होती. यावेळी विशेष तपास पथकानं रुपाली चाकणकर आणि खरात यांचे आर्थिक संबंध, खासगी पतसंस्थांमधली खाती, खरात याच्या धार्मिक संस्थेमधलं चाकणकर यांचं सदस्यत्व, या आणि इतर मुद्द्यांबाबत चौकशी केली.

**गोयल-वाटप**

मातृ दिनानिमित्त काल मुंबईत मातृशक्ती पोषण वितरण कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं. या कार्यक्रमात केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांच्या हस्ते माता पोषण संचाचं वाटप करण्यात आलं. गरोदरपणाच्या शेवटच्या टप्प्यात महिलांच्या त्याचबरोबर नवजात अर्भकांच्या पोषणाच्या गरजा लक्षात घेऊन हा खास संच तयार करण्यात आला असल्याचं गोयल यांनी यावेळी बोलताना सांगितलं. माता आणि बालकांच्या आरोग्याचा देशाच्या भवितव्याशी थेट संबंध असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**दुय्यम निबंधक कार्यालय**

तहसीलदारांनी तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन जनतेचे प्रश्न गावातच मार्गी लावावेत असं आवाहन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं आहे. सोलापूर जिल्ह्यातील करमाळा इथल्या सह दुय्यम निबंधक कार्यालयाच्या नूतन इमारतीचं उद्घाटन बावनकुळे यांच्या हस्ते काल करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. जनतेनं गाऱ्हाणी घेऊन मंत्रालयात जाण्याऐवजी मंत्र्यांनी गावात जाऊन जनतेची निवेदनं-तक्रारी स्वीकारून त्या सोडवाव्यात हे या सरकारचे धोरण आहे. पुढील चार महिन्यात जिल्ह्यातील एकही गाव यातून सुटणार नाही याची खबरदारी जिल्हाधिकाऱ्यांनी असंही बावनकुळे म्हणाले.

**हवामान**

दक्षिण कोकण, मध्य महाराष्ट्र मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.